# ✳ परिशिष्टे ✳

# परिशिष्ट

## अ)लेखक उत्तम बंडू तुपे यांची मुलाखत

उत्तम बंडू तुपे यांच्या कथांचा अभ्यास करताना त्यांच्या लेखनाविषयी काही प्रश्न निर्माण झाले. त्या प्रश्नांची उकल करून घेण्यासाठी प्रत्यक्ष लेखकांची मुलाखत घेण्याचे ठरविले त्याप्रमाणे श्री उत्तम बंडू तुपे यांची पुणे येथे दि.११/१२/२००० रोजी घेतलेली वाङ्मयीन मुलाखत या परिशिष्टात पुढीलप्रमाणे नोंदविली आहे.

प्रश्न –१ आपल्या कथालेखनातील पात्रे प्रामुख्याने गोरगरीब, उपेक्षित, कष्टकरी, शेतमजूर आहेत याचे कारण काय?

उत्तर जगताना माझे जगणे ज्या सामाजिक समूह घटकांच्या आसपास व दारिद्रयाच्या, अज्ञानाच्या कचाटयात आणि अंधश्रध्दाळूपणा यामुळे दुःख, व्यथा-वेदना जवळून पाहता, अनुभवता आल्या, म्हणून लिखाणातून जसजसा मी वाढत गेलो तसतशी व्यथा वेदनांची जाणीव प्रकर्षाने होऊ लागली. साहजिकच माझ्याकडून असे लेखन झाले. माझ्या कथा-कादंबरीतील पात्रे ही जाणूनबुजून आणलेली नाहीत, तर ती ओघाओघाने अस्सल रूप घेऊन आलेली आहेत.

प्रश्न-२ कथासंग्रहांच्या तुलनेत, कांदबरीलेखन संख्येने अधिक आहे याचे नेमके कारण काय?

उत्तर- ज्या वेळेस मी कथा लिहिल्या, त्यावेळेस माझ्या असे लक्षात आले, की मला जे सांगायचे आहे ते कथेमध्ये बसत नाही. जीवनाचे व्याप्त अनुभव कथाबीजातून घेऊनच पुढे कादंबरी लेखनाला गती मिळाली आणि कादंबरी लेखनाचा वेग झपाटयाने वाढत गेला त्यामुळे तुलनेने कथासंग्रह लेखन कमी राहिले व कादंबरी लेखन संख्येने अधिक वाढले.

प्रश्न-३ कथा लेखन करताना आपणापुढे कोणत्या लेखकांचे आदर्श होते?

उत्तर प्रथम लावण्या लिहिण्याचा छंद गावाकडे लागला ('एणकूळ' ता.खटाव ) विज्ञापनातील शंकर पाटील, द.ता.भोसले, आनंद यादव यांच्या कथा वाचून लेखन प्रेरणा मिळाली. हेच माझ्यापुढचे आदर्श लेखक आहेत.

प्रश्न-४ आपण लिहिलेल्या कथांपैकी आवडती कथा कोणती?

उत्तर कथा आणि त्यांचे विषय आवडीचे असल्याने नेमकी एखादी कथाच आवडीची असे सांगता येणार नाही. तरीपण 'हुंडा' ही माझी प्रथम कथा विशेष भावली. साहित्य परिषदेकडून या कथेला पाचशे रुपयांचे पारितोषिक मिळाले.

प्रश्न –५ग्रामीण साहित्यातील जाणिवा व दलित साहित्यातील जाणिवा यामध्ये तुमच्या मते साम्य-विरोध कुठे आहे?

उत्तर जे साहित्य सकस आहे ते साहित्य महत्त्वाचे जातीवार, भाषावार, प्रांतवार साहित्याचे वर्गीकरण होऊ शकत नाही. साहित्याला जात, पंथ नसते. मी यामध्ये साम्य-भेद मानत नाही. साहित्यिक मनाला भावलेले दुःख, वेदना प्रतिभेतून व्यक्त करत असतो.

प्रश्न –६तुमच्या कथालेखनात अधिक महत्त्व कशाला देता? स्वानुभवाला की कल्पनेला?

उत्तर माझ्या लेखनात मी स्वानुभवाला अधिक महत्व देतो. अनुभूती दोन प्रकारची असते. भोगून बघनं आणि बघून भोगनं. माझ्या साहित्यात कल्पनेला जागा नाही.

प्रश्न –७लेखक म्हणून तुमचा आवडता वाङ्मय प्रकार कोणता?

उत्तर कथा, कादंबरी हे दोन्ही प्रकार मला आवडतात.

प्रश्न –८आजच्या ग्रामीण साहित्याबद्दल तुम्हाला काय वाटते?

उत्तर ग्रामीण भागातील वास्तव आजच्या ग्रामीण चित्रणातून येत नाही. बदलती खेडी, त्या खेडयातील बदलत्या माणसांचे जीवनमान आजच्या कथेमधून दिसत नाही. मात्र खेडयातील घरे बदललेली दिसतात. जगण्याच्या जाणिवा आपल्या लेखनातून प्रकट करण्यासाठी आजचा साहित्यिक खेडयाकडे वेगळया दृष्टिकोनातून पाहतो काय? हे महत्त्वाचे वाटते.

प्रश्न –९तुम्ही पुण्यात राहता पुढील कथात शहरी भागातील अनुभव लिहावे, असं तुम्हाला नाही वाटत?

उत्तर मी स्वतःचा उदरनिर्वाह करण्यासाठी शहरात राहत असलो, तरी माझी नाळ ही गावाकडच्या मातीत रूजलेली आहे. त्याची अनुभूती रंध्रा-रंध्रात आहे. तिच मला लेखनाला उद्दिपीत करते. शहरातील जीवन अस्थिर असल्याने मला गावाकडील जगणे महत्त्वाचे वाटते. त्यामुळे त्यावरच माझे लक्ष केंद्रित करून लेखन करतो.

प्रश्न –१० 'आंदण' व 'कोंबारा' या कथासंग्रहांतील तुमच्या कथांचा समावेश ग्रामीण साहित्य, की दलित साहित्यामध्ये करावा, याविषयीचे तुमचे मत काय?

उत्तर मी लिहू घातल्यापासून माझ्या जाणिवा खेडयातील जीवनमान आणि खेडूतांच्या समस्या याच्यावर केंद्रित झाले असल्याने, खेडयात राहणारा दलित काय किंवा इतर सामान्य माणूस त्याच्या पुढील समस्या सारख्याच वाटतात. त्यामुळे मला दलित वाङ्मय आणि ग्रामीण वाङ्मय यामध्ये फरक वाटत नाही.

प्रश्न –११ भविष्यातील वाङ्मय निर्मितीविषयी तुमचे संकल्प कोणते आहेत?

उत्तर 'मदघर', 'पान','कसबीन' या कादंबऱ्यांचे संकल्प आहेत. 'मदघर' या कादंबरीचे लेखन सुरू आहे.

प्रश्न –१२ 'आंदण' व 'कोंबारा' या आपल्या कथासंग्रहातून स्त्रीचित्रणाची संख्या अधिक आहे. 'स्त्री'विषयी आपला दृष्टिकोन काय?

उत्तर 'स्त्री'विषयी माझ्या साहित्यातून वेळोवेळी त्यासंबंधीचा दृष्टिकोन स्पष्टपणाने साकार झालाच आहे. तरीपण सांगतो स्त्री ही फक्त भोगवस्तू म्हणून वापरने किंवा तिचा वापर करून घेणाऱ्या या पुरुषप्रधान संस्कृतीवर मात्र माझा राग आहे. स्त्री ही क्षणाची पत्नी आहे व अनंत काळची माता आहे! काळया आईप्रमाणे आहे. म्हणूनच माता आणि भू-माता यातून निर्माण होणारा निसर्ग मला सारखाच वाटतो.

प्रश्न –१३ नव्या साहित्यिकांना आपला संदेश कोणता?

उत्तर जिज्ञासा ताजी ठेवण्यासाठी अनुभूती आणि सभोवतालच्या परिस्थितीची जाणिवपूर्वक चाचणी करून आपल्या साहित्यात पोषक असणारी बीजे पाहून कादंबरी, कथालेखन करता येईल. परंतु हे करत असताना माणसाच्या जगण्याची परिभाषा याची नोंद आपल्या प्रतिभेतून अक्षर मुद्रित व्हावी. येणाऱ्या सुजान पिढीसाठी सूज्ञपणाने लेखन व्हावे. त्यातून एक समृध्द साहित्यिक बलवान राष्ट्र करण्यासाठी उपयोगी व्हावा.

## ब) उत्तम बंडू तुपे यांची साहित्य संपदा

अ) कथासंग्रह लेखन :-

| | | |
|---|---|---|
| १) | आंदण | १९८६ |
| २) | पिंड | १९८७ |
| ३) | माती आणि माणसं | १९९३ |
| ४) | कोंबारा | १९९१ |

ब) कादंबरी लेखन :-

| | | |
|---|---|---|
| १) | काटयावरची पोटं (आत्मनिवेदन) | १९८२ |
| २) | इजाळं | १९८४ |
| ३) | झावळ | १९८४ |
| ४) | झुलवा | १९८६ |
| ५) | खाई | १९८८ |
| ६) | कळाशी | १९८८ |
| ७) | भस्म | १९९१ |
| ८) | लांबलेल्या सावल्या | १९९२ |
| ९) | शेवंती | १९९१ |
| १०) | खुळी | १९९१ |
| ११) | चिपाडं | १९८९ |